Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Kolhapur Divisional Board, 539, Rajendranagar, Kolhapur - 416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, 539, राजेंद्रनगर, कोल्हापूर - 416004

Ph. No. (0231) 2696101/ 2 / 3 Website - www.sscboardkolhapur.in Email - divsec.kop@gmail.com

क्र. कोविमं/लेखा/दुष्काळग्रस्त फी माफी /2026-27/4137 दिनांक : 30 / 10 / 2026

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
मान्यताप्राप्त सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर जिल्हा

विषय : फेब्रु/मार्च 2027 च्या परीक्षा आवेदनपत्रामध्ये दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क सवलतीसाठी उपलब्ध केलेल्या नवीन टॅबबाबतच्य मार्गदर्शक सूचना.

संदर्भ : राज्य मंडळाचे क्र.रा.मं./गणकयंत्र/157/4667, दिनांक 30.10.2026 रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आगामी फेब्रु/मार्च 2027 च्या इ.10 वी व इ.12 वी परीक्षांचे नियमित विद्यार्थ्यांचे ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्र भरण्याचे काम सध्या सुरु आहे. शासनाने राज्यातील दुष्काळ जाहीर केलेल्या भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क सवलतीची नोंद करण्यासाठी परीक्षा आवेदनपत्र भरण्याच्या ऑनलाईन प्रणालीवर एक नवीन टॅब उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

सदर नवीन टॅबचा वापर शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी कसा करावा, याबाबतची सविस्तर कार्यपध्दती स्पष्ट करणाऱ्या मार्गदर्शक सूचना (User Guidelines) या पत्रासोबत जोडण्यात आलेला आहेत.

तरी सर्व माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी सदर मार्गदर्शक सुचनानुसार दुष्काळग्रस्त भागातील सर्व पात्र विद्यार्थ्याची परीक्षा शुल्क सवलतीची नोंद विहित मुदतीत पूर्ण करून घेण्यात यावी. कोणताही विद्यार्थी सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

सोबत : मार्गदर्शक सूचना (User Guidelines)

(गजानन तानाजी उकिर्डे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव :

1. निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समिती, सातारा / सांगली / कोल्हापूर
2. मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे.

प्रत माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :

1. मा. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
   यांना कळविण्यात येते की, दुष्काळग्रस्त भागातील सर्व पात्र विद्यार्थ्याची परीक्षा शुल्क सवलतीची नोंद विहित मुदतीत पूर्ण करून घेण्याबाबत पाठपुरावा करावा.
2. शिक्षणाधिकारी (माध्य), सातारा / सांगली / कोल्हापूर
   यांना कळविण्यात येते की, दुष्काळग्रस्त भागातील सर्व पात्र विद्यार्थ्याची परीक्षा शुल्क सवलतीची नोंद विहित मुदतीत पूर्ण करून घेण्याबाबत माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून पाठपुरावा करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याची कार्यपध्दती

माध्य/उच्च माध्य परीक्षेसंदर्भात मंडळाच्या आवेदनपत्र भरण्याच्या पोर्टलवर शाळा/क.महाविद्यालयांच्या लॉगीन मध्ये दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. ही सुविधा वापरण्यापुर्वी विद्यार्थ्याचे आवेदनपत्र पोर्टलवर भरलेले असणे आवश्यक आहे.

शाळा/क.महाविद्यालयांनी लॉगीन केल्यानंतर खालिल प्रमाणे कार्यवाही करावी.

१) लॉगीन केल्यावर Application menu खालिल Manage Dushkalgrast या सब-मेनुवर क्लिक करा

२) खालील इमेज मधील New Application मधील या बटनवर क्लिक करा.



३) दिलेल्या ड्रॉपडाऊन मधील Serial Number हे ऑप्शन निवडा



४) दिलेल्या टेक्स्टबॉक्समध्ये ४ अंकी आवेदन पत्र क्रमांक टाका.

५) विद्यार्थ्याच्या नावाची खात्री करुन पालकांच्या/विद्यार्थ्यांच्या बँक खात्याला संलग्न असलेला आधार क्रमांक टाका. (आधार क्रमांक अचुक तसेच बँक खात्यासोबत लिंक असणे आवश्यक आहे)

६) पात्रतेबाबत दिलेल्या निकषांची खात्री करुन योग्य ते चेकबॉक्स सेलेक्ट करुन Save बटन दाबुन दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र सेव्ह करा.



७) अशा पध्दतीने सेव्ह केलेले आवेदनपत्र मंडळास पाठविण्यासाठी Manage Dushkalgrast या सब-मेनुवर क्लिक करुन Dushkalgrasta/ दुष्काळग्रस्त & SEND TO BOARD या बटनवर क्लिक करा.



८) आपण आवेदनपत्र भरलेले तसेच दुष्काळग्रस्त म्हणुन नोंदविलेले विद्यार्थ्यांचे Application Sr.No. सिलेक्ट करुन Send to Division Board बटन दाबा.



अत्यंत महत्वाचे : दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र “Manage Dushkalgrasta” या मेनुमधुन नोंदविल्या नंतर “Send to Board” करणे आवश्यक आहे. अशा पध्दतीने नोंदविलेले आवेदनपत्रांचे अनुक्रमांक पेमेंट करण्यासाठी उपलब्ध होणार नाही याची शाळा/क.महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.